महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१० वे | दिनांक : २४/०७/२०२६ | वार : शुक्रवार

## विद्यार्थी आंदोलनाच्या राजकारणावर शिरसाटांचा विरोधकांवर हल्लाबोल



**छत्रपती संभाजीनगर :** दिल्लीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरुवातीला स्वयंस्फूर्तीने उभे राहिले होते. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याने समाजातील प्रत्येक घटक या आंदोलनाकडे सहानुभूतीने पाहत होता. मात्र, आता काही राजकीय पक्ष या आंदोलनाचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असून आंदोलनाला राजकीय रंग देण्याचे काम सुरू असल्याचा आरोप राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला. पत्रकार परिषदेत बोलताना शिरसाट यांनी उद्धव ठाकरे, राज ठाकरे, शरद पवार, राहुल गांधी यांच्यासह विरोधकांवर टीका करत आंदोलनाच्या मूळ उद्देशापासून लक्ष विचलित होत असल्याचा दावा केला.

शिरसाट म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या आंदोलनाला आता विविध राजकीय पक्ष पाठिंबा देत आहेत. व्यासपीठावर जाऊन भाषणे केली जात आहेत आणि आंदोलनाची दिशा आपल्या पक्षाकडे वळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मूळ प्रश्न बाजूला पडत असून आंदोलनाला राजकीय स्वरूप दिले जात आहे. त्यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या पाहिजेत आणि त्यांच्यावर कोणताही अन्याय किंवा अत्याचार होणार नाही याची सरकारने काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये, हा सर्वांचाच दृष्टिकोन असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचे कोणत्याही परिस्थितीत समर्थन करता येणार नाही, असेही शिरसाट म्हणाले. "विद्यार्थी हे विद्यार्थी आहेत. त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे. अशी घटना पुन्हा घडू नये, यासाठी सरकार निश्चित काळजी घेईल," असे त्यांनी सांगितले. दिल्लीत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी आंदोलन करत असल्याने त्यांच्या पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आंदोलनादरम्यान घडलेल्या काही घटनांमुळे आई-वडिलांची चिंता वाढली असून ती स्वाभाविक असल्याचे शिरसाट यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्यासह अनेक नेते आंदोलनस्थळी जात आहेत. आता राज ठाकरेही रस्त्यावर उतरणार असल्याचे जाहीर झाले आहे. त्यामुळे आंदोलनाला राजकीय कलर मिळत असून काही पक्ष विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपेक्षा स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला.

अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या भूमिकेवरही शिरसाट यांनी टीका केली. "आता त्यांच्या मौन आंदोलन आणि उपोषणाकडे लोक गांभीर्याने पाहत नाहीत. जिथे बोलायला पाहिजे तिथे ते मौन बाळगतात आणि जिथे मौन आवश्यक असते तिथे बोलतात," असा टोला त्यांनी लगावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले असून पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर फास्ट ट्रॅक न्यायालयाच्या माध्यमातून कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत, असे शिरसाट म्हणाले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासंदर्भात कोणतीही तडजोड होणार नाही, अशी भूमिका केंद्र सरकारची असल्याचा दावाही त्यांनी केला.

## बारामतीत अजित पवारांच्या पुतळ्याचे अनावरण





**बारामती :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरुवारी बारामती येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पूर्णाकृती कांस्य पुतळ्याचे अनावरण केले. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचेही उद्घाटन करण्यात आले.

नटराज नाट्य कला मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सुनेत्रा पवार यांच्यासह कुटुंबीय, जय पवार आणि अनेक समर्थक उपस्थित होते. पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुनेत्रा पवार यांनी दिवंगत अजित पवारांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी छायाचित्र प्रदर्शनाला भेट देत अजित पवार यांच्या बालपणापासून ते राजकीय कारकिर्दीपर्यंतच्या विविध टप्प्यांचे दर्शन घडवणारी छायाचित्रे पाहिली.

कार्यक्रमानंतर सुनेत्रा पवार यांनी समाजमाध्यम 'एक्स'वर पोस्ट करत भावना व्यक्त केल्या. "आठवणींच्या पलीकडे... दादांचा जिवंत वारसा! स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उभारण्यात आलेल्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे दर्शन घडवणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनाचे लोकार्पण आज संपन्न झाले," असे त्यांनी म्हटले.

पुढे त्या म्हणाल्या, "दादा आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार, कार्यपद्धती, जनहिताची बांधिलकी आणि विकासाची दूरदृष्टी आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. बारामतीसह महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेला वारसा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील." त्यांनी असेही नमूद केले की, हा पुतळा आणि छायाचित्र दालन केवळ आठवणी जपणारे नसून अजित पवार यांच्या विचारांचा, कार्याचा आणि विकासदृष्टीचा जिवंत वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणारे प्रेरणास्थान ठरेल.

अहवालांनुसार, 28 जानेवारी रोजी बारामती विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न करत असताना Learjet 45 (VT-SSK) या खासगी विमानाचा अपघात झाला होता. या दुर्घटनेत अजित पवार, त्यांचे वैयक्तिक सुरक्षा अधिकारी, एक विमान परिचारिका आणि दोन्ही वैमानिक अशा पाच जणांचा मृत्यू झाला होता.

## रोहित पवारांचा सवाल: प्रधानांचा राजीनामा कधी?

**मुंबई :** दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाची दखल घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी मोठी घोषणा केली. पेपरफुटी प्रकरणातील दोषींना तातडीने शिक्षा देण्यासाठी 'फास्ट ट्रॅक कोर्ट' स्थापन करण्यात येतील, असे पंतप्रधानांनी जाहीर केले. त्यांच्या या भूमिकेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवार यांनी आभार मानत स्वागत केले आहे. मात्र, त्याचवेळी त्यांनी थेट सरन्यायाधीशांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, केवळ ट्विट करून चालणार नाही तर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी आक्रमक मागणी केली आहे. नीट आणि इतर परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात संतापाची लाट असून जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचे जोरदार आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स' वर पोस्ट करत सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "पेपरफुटी प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट्स बनवले जातील. देशातील युवा वर्गाचे हित आणि त्यांचे उज्ज्वल भविष्य हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्या कोणालाही कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. पंतप्रधानांच्या या घोषणेनंतर आमदार रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडियारून एक पोस्ट शेअर केली. त्यांनी फास्ट ट्रॅक कोर्टाच्या निर्णयाबद्दल पंतप्रधानांचे आभार मानले, मात्र न्यायव्यवस्थेतील भूमिकेवर गंभीर सवाल उपस्थित केले. रोहित पवार आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, "आदरणीय पंतप्रधान साहेब, अखेर आपण कठोर भूमिका जाहीर केली, फास्ट ट्रॅक कोर्टची घोषणा केली त्याबद्दल आपले आभार! पण युवा वर्गाला 'कॉकरोच' म्हणणारे आणि विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या सुनावणीला 'टाईमपास' समजणारे सरन्यायाधीश सूर्यकांत साहेब योग्य निकाल देतील का? त्यांच्या मते टाईमपास असलेल्या या विषयावर सुनावणी करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ तरी असेल का?"



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जुलै २०२६


## भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी घेतली आ. बसवराज पाटील यांची मुरुम येथे सदिच्छा भेट



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी गुरुवारी (ता. २३) विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांच्या मुरुम येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना तुळजाभवानीची भव्य प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, निलंगाचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्त्याचे सहअध्यक्ष शरण पाटील, उदगीरचे माजी आमदार गोविंद केंद्रे, भाजपचे नेते गणेश हाके, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, संपदा शरण पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. या भेटप्रसंगी पाटील परिवाराच्या वतीने त्यांचे आदरतिथ्य करत स्वागत करण्यात आले. या भेटीदरम्यान राजकीय आणि सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. धाराशिव व लातूर जिल्ह्यातील बहुसंख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथे रविंद्र चव्हाण यांचा पाटील परिवाराच्या वतीने सत्कार करताना बसवराज पाटील, बापूराव पाटील, शरण पाटील व अन्य.

## महाराष्ट्र बंदला एमजीएम विद्यापीठाचा सकारात्मक प्रतिसाद; वैद्यकीय सेवा वगळता इतर विभागांचे सहकार्य



**छत्रपती संभाजीनगर :** उद्या होणाऱ्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर सम्यक विद्यार्थी आंदोलन व वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने आज एम. जी. एम. विद्यापीठाचे कुलपती मा. अंकुशराव कदम यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. विद्यापीठ परिसरातील वैद्यकीय सेवा वगळता इतर सर्व शैक्षणिक विभागांनी महाराष्ट्र बंदला सहकार्य करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीची दखल घेत कुलपती मा. अंकुशराव कदम यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. वैद्यकीय सेवा अबाधित ठेवून विद्यापीठ परिसरातील इतर शैक्षणिक विभागांकडून महाराष्ट्र बंदला सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.यावेळी विद्यापीठ परिसरातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी लोकशाही मार्गाने तसेच शांततेत महाराष्ट्र बंदला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान तसेच वंचित बहुजन आघाडीचे पश्चिम जिल्हाध्यक्ष रुपचंद गाडेकर, पूर्व जिल्हाध्यक्ष रामेश्वर तायडे, युवा जिल्हाध्यक्ष सतीश गायकवाड, मध्य शहराध्यक्ष संदिप जाधव, प्रा.अमोल घुगे, प्रा.अविनाश सावंत, अमोल बोर्डे, पवन भिसे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## जामुवंतगडावरील राज्यस्तरीय तिफण लेखक वाचक मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी कृषिभूषण कल्याणराव खडके



**जालना (प्रतिनिधी) :** त्रैमासिक 'तिफण', तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद यांच्या वतीने ऑगस्ट महिन्यातील तिसऱ्या रविवारी जामुवंतगडावर आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय तिफण लेखक-वाचक मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाला (आवा) येथील प्रगतशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते कृषिभूषण कल्याणराव रामराव खडके यांची निवड करण्यात आली आहे.कल्याणराव खडके हे मराठवाड्यात आदर्श आणि प्रगतशील शेतकरी म्हणून परिचित आहेत. त्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. शेतीबरोबरच ते विविध सामाजिक, धार्मिक आणि कृषी विषयक उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतात. समाजसेवा आणि कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना श्री छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते "धर्मवीर भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तिफण वाचक चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लेखक, कवी, वाचक आणि शेतकरी यांच्यातील संवाद वाढवणे, साहित्याला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना साहित्याच्या माध्यमातून वाचा फोडणे हा या मेळाव्याचा उद्देश आहे. जामुवंतगडासारख्या ऐतिहासिक ठिकाणी होणाऱ्या या मेळाव्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने साहित्यिक आणि वाचक उपस्थित राहणार आहेत.स्वागताध्यक्षपदी निवड झाल्यानंतर कल्याणराव खडके यांनी सांगितले की, तिफण व संशोधन परिषद सारख्या चळवळीच्या माध्यमातून साहित्य आणि शेती यांना जोडण्याचे महत्वाचे काम होत आहे आणि जामुवंतगडावर होणारा हा राज्यस्तरीय लेखक-वाचक मेळावा सर्वतोपरी यशस्वी करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील. त्यांच्या निवडीची माहिती तिफण लेखक-वाचक मेळाव्याचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे, भाषा , साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, तिफण वाचक चळवळ चे अध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, डॉ. रामचंद्र झाडे,डॉ. यशवंत सोनुने, डॉ. सत्यशिला तौर, डॉ. एकनाथ शिंदे, नारायण खरात , डॉ. मारोती घुगे, अशोक डोरले, विजय जाधव, यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जुलै २०२६

## जेईएस महाविद्यालय जालना च्या पर्यवेक्षकपदी डॉ. फुलचंद मोहिते



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे ई एस महाविद्यालय जालना च्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक पदी प्रा. डॉ. फुलचंद मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली असून याबद्दल त्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री. श्रीनिवास भक्कड , प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. फुलचंद मोहिते यांचा महाविद्यालयातील मित्र मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, छत्रपती संभाजीनगर, शिक्षण विभा-गाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. परशूराम चौरे, प्रा. वाल्मीक जाधव आदी उपस्थित होते.


## महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद; शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना सहकार्याचे आवाहन




**छत्रपती संभाजीनगर** : उद्या होणाऱ्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या शिष्टमंडळाने आज प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी महाराष्ट्र बंदला सहकार्य करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीची दखल घेत शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील संबंधित शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्र बंदला सहकार्य करण्याबाबत आवश्यक आवाहन करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवत महाराष्ट्र बंदला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, पश्चिम जिल्हाध्यक्ष रुपचंद गाडेकर, पूर्व जिल्हाध्यक्ष रामेश्वर तायडे, प्रा. अमोल घुगे, प्रा. अविनाश सावंत, अमोल बोर्डे आणि पवन भिसे उपस्थित होते.




## महाराष्ट्राच्या पावनभूमीतील लातूरची युवा भूमिकन्या शर्वरी सुवर्णा विवेक डोंगरेचा देशात प्रथम क्रमांक



**मुरुम (प्रतिनिधी)** : भारतातील,महाराष्ट्रातील तमाम संगीत प्रेमी आणि गुरव समाजासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची वार्ता.लातूर येथील सुप्रसिद्ध युवा गायिका कु. शर्वरी डोंगरे हिने एप्रिल—मे २०२५ मध्ये अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ आयोजित 'संगीत विशारद' परीक्षेत व गायन (Vocal Music) विषयात संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक मिळवत सर्वाधिक गुण प्राप्त केले आहेत.या उल्लेखनीय यशाबद्दल कु. शर्वरी डोंगरे हीची एकूण 10 प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी निवड झाली असून त्यामध्ये भारतातून प्रथम क्रमांकाच्या खालील ८ पुरस्कारांचा समावेश आहे:* प्रीतम कौर सौदी पुरस्कार* कै. पं. द.वि. पलुस्कर पुरस्कार* सौ. नलिनी प्रताप कानविंदे पुरस्कार* प्रा. वासुदेव चिंतामणी वाघमारे पुरस्कार* हरी ओम ट्रस्ट (गायन) प्रथम पारितोषिक* श्री हरिश्चंद्र बाळकृष्ण पोतदार पुरस्कार* पं. एन. के. करहाडे स्मृती पुरस्कार* कै. सौ. प्राजक्ता पुरुषोत्तम कुलकर्णी पुरस्कार. आणि महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकाचे खालील २ पुरस्कार प्राप्त केले आहेत. *पं. शंकर सप्रे पुरस्कार. *कै. सुश्री शैलजा जावडेकर पुरस्कार.अत्यंत कमी वयात संगीत क्षेत्रात एवढी उंच भरारी घेऊन देशात प्रथम येणे ही केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून संपूर्ण गुरव समाजासाठी अभिमानाची बाब आहे. अशा यशासाठी वर्षानुवर्षांची साधना, अथक परिश्रम, चिकाटी आणि गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असते. कु. शर्वरीने आपल्या मेहनतीच्या बळावर हे स्वप्न साकार करून संगीतविश्वात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे.अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाचा दीक्षांत समारंभ दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी विष्णूदास भावे नाट्यगृह, वाशी डेपो जवळ, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून, या सोहळ्यात कु. शर्वरी विवेक डोंगरे यांचा १० प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.यापूर्वीच्याही मध्यमा परीक्षेत शर्वरीने देशात प्रथम क्रमांक मिळवला होता. तब्बल एक तपापासून तिची संगीत साधना सुरू आहे .या दरम्यान तिला पंडित शंकरराव व्यास पुरस्कार आणि इतर प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे राष्ट्रीय स्तरावरील स्वरतीर्थ युवा, चला हवा येऊ द्या, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद महाराष्ट्र महोत्सव, शाहू संगीत महाविद्यालय, दिवाळी पहाट ,श्री दत्त महोत्सव, सृजन मासिक संगीत सभा आदी मधून लातूर, मालेगाव, संभाजीनगर, धाराशिव सहभाग घेतला आहे. भारत सरकारच्या वतीने तिला गौरव वृत्तीही देण्यात येत आहे .केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने दिल्ली येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये पण शर्वरी सहभागी झाली होती. भरत नाट्य मंदिर, पुणे, तोच चंद्रमा नभात हा कार्यक्रम पुण्यातील भरत नाट्य मंदिरात लोकमत सखीच्या वतीने अतिशय यशस्वी पद्धतीने सादर केला. साहित्य वारी निर्मित या कार्यक्रमाला पुणेकरांनी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.पुणे येथे अभियांत्रिकी विद्युत शिक्षण सुरू असताना शर्वरीने घेतलेली उत्तुंग भरारी निश्चितच अभिमानास्पद आहे. लातूरची भूमिकन्या असलेली शर्वरी हिने देशात संगीत क्षेत्रातली संगीत विशारद ही पदवी देशात प्रथम क्रमांकाने पटकावत आई वडील - गुरुजन आणि समाजाचे नाव उज्वल केल्याबद्दल तिच्या लातूर स्थित निवासस्थानी जाऊन तिचे डॉ .रमाकांत पाटील यांनी अभिनंदन करून भविष्यकालीन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शर्वरीची आई सुवर्णा डोंगरे, काका माननीय त्रिंबक सिंदफळकर लातूर.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जुलै २०२६


## श्रद्धा, भक्ती आणि माणूसपण जपणारी पांडुरंगाची वारी

मित्रांनो आज आपण थोड्याशा वेगळ्या विचाराकडे वळणार आहोत. पंढरीची वारी केवळ पंढरपूरकडे जाणारी पायी यात्रा नाही. वारी म्हणजे माणसाने माणसाला भेटण्याचा, माणसाने माणसाला समजून घेण्याचा आणि माणसाने माणसासाठी उभे राहण्याचा एक महान सामाजिक बदलाचा सोहळा आहे.पंढरपूरच्या दिशेने चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या पावलांमध्ये भक्ती असते; पण त्या भक्तीच्या पलीकडे माणूसपणाची एक मोठी शक्ती दडलेली असते. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवा झेंडा, ओठांवर “ज्ञानोबा-तुकाराम” आणि हृदयात पांडुरंगाचे नाव घेऊन चालणारा वारकरी केवळ मंदिराकडे जात नसतो,तो स्वतःच्या अंतरंगातील अहंकार, द्वेष, मत्सर आणि भेदभाव मागे सोडून माणुसकीच्या दिशेने चालत असतो.भूमिपुत्र वाघ या सामाजिक कार्यकर्त्याच्या नजरेतून पाहिल्यास दिंडी सोहळा म्हणजे समाजाला एकत्र आणणारी चालती-बोलती लोकशाळा आहे.या दिंडीत श्रीमंत आणि गरीब एकत्र चालतात. शेतकरी, कामगार, महिला, युवक, वृद्ध, शिक्षित आणि अशिक्षित,सगळे एकाच रांगेत उभे राहतात. कुणाच्या कपड्यांची किंमत विचारली जात नाही, कुणाची जात विचारली जात नाही, कुणाचा धर्म विचारला जात नाही. एकच ओळख असते“माऊली!”हीच वारीची खरी ताकद आहे.आज समाजामध्ये माणूस माणसापासून दूर जात आहे. मोबाईलच्या पडद्यावर हजारो मित्र आहेत; पण शेजारी राहणाऱ्या माणसाच्या दुःखाची जाणीव कमी होत चालली आहे. अशा काळात वारी आपल्याला पुन्हा शिकवते एकत्र चालणे म्हणजे एकमेकांची जबाबदारी स्वीकारणे.दिंडीत एखादा वारकरी थकला तर दुसरा त्याला आधार देतो. कोणाला पाणी हवे असेल तर पाणी दिले जाते. कोणाला औषधाची गरज असेल तर मदत केली जाते. अनोळखी माणूस काही क्षणांतच आपला होतो. ही केवळ धार्मिक भावना नाही; ही सामाजिक बांधिलकी आहे.म्हणूनच माझ्या दृष्टीने पांडुरंगाची वारी म्हणजे “सेवेचे चालते फिरती सेवेचे विद्यापीठे” आहे.वारी आपल्याला शिकवते की देव केवळ मंदिरात नसतो. तो तहानलेल्या वारकऱ्याला दिलेल्या पाण्याच्या घोटात असतो. थकलेल्या माणसाला दिलेल्या आधारात असतो. आजारी व्यक्तीच्या सेवेत असतो. भुकेल्याला दिलेल्या अन्नात असतो. अश्रू पुसणाऱ्या हातात असतो.पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपूरला जाण्यापूर्वी माणसाला माणूस म्हणून भेटणे आवश्यक आहे.समाज विकासाच्या क्षेत्रात काम करताना मला नेहमी जाणवते की समाज बदलण्यासाठी केवळ योजना पुरेशा नसतात; माणसांमध्ये संवेदना जागृत करावी लागते. वारी ही संवेदना जागृत करते. ती सांगते तुम्ही एकटे नाही. तुमच्या दुःखात समाज तुमच्यासोबत आहे.दिंडीमध्ये शिस्त आहे, सामूहिकता आहे, स्वच्छता आहे, सेवा आहे आणि परस्पर सहकार्य आहे. हजारो लोक एकाच ध्येयाने चालतात. कोणताही मोठा अधिकारी नाही, कोणताही लहान माणूस नाही. सर्वजण माऊली आहेत.ही समता आजच्या समाजासाठी अत्यंत मोठा संदेश आहे.वारी म्हणजे परंपरा आहे; पण ती केवळ परंपरा नाही. वारी म्हणजे श्रद्धा आहे; पण ती केवळ अंधश्रद्धा नाही. वारी म्हणजे भक्ती आहे; पण ती केवळ देवाकडे मागण्याची भक्ती नाही. वारी म्हणजे देण्याची, जगण्याची आणि माणूसपण जपण्याची भक्ती आहे.वारकरी पंढरपूरला जातो आणि विठ्ठलाकडे काही मागतो. पण खऱ्या अर्थाने तो परतताना समाजाला काहीतरी देऊन परतला पाहिजे—प्रेम, करुणा, सेवा, सहकार्य आणि माणुसकी.आज जर प्रत्येक वारकऱ्याने वारीतून एक संकल्प घेतला की—“मी एका गरजू माणसाला मदत करीन,एका झाडाचे संरक्षण करीन,एका मुलाच्या शिक्षणाला हातभार लावीन,एका दुःखी व्यक्तीचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न करीन,”तर पांडुरंगाची वारी खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाची वारी बनेल.कारण विठ्ठलाच्या पायाशी डोके टेकविणे ही भक्ती आहे; पण विठ्ठलाच्या प्रत्येक लेकराचा हात हातात घेणे हे माणूसपण आहे.माझ्यासाठी दिंडी सोहळा म्हणजे केवळ टाळ-मृदंगाचा नाद नाही. तो समाजातील तुटलेली मने जोडणारा नाद आहे. तो अहंकार कमी करणारा नाद आहे. तो भेदभावाच्या भिंती पाडणारा नाद आहे. तो सेवाभाव जागवणारा नाद आहे.“ज्ञानोबा-तुकाराम”च्या जयघोषात केवळ दोन संतांची नावे नाहीत; तर ज्ञान, भक्ती, समता आणि माणुसकीचा संपूर्ण विचार आहे.आणि म्हणूनचवारी चालते पंढरीकडे,पण तिचा खरा प्रवास माणसाच्या अंतःकरणाकडे असतो.दिंडी जाते विठ्ठलाच्या भेटीसाठी,पण वाटेत ती हजारो माणसांना माणूस म्हणून भेटते.हीच पांडुरंगाच्या वारीची खरी शक्ती आहे.हीच दिंडीची खरी ओळख आहे.आणि हेच माणूसपण जपणारे वारकरी संस्कृतीचे अमर सौंदर्य आहे.... म्हणून या भारत मातेच्या प्रत्येक सुपुत्राने एक पंढरीची वारी चालली पाहिजे. बोलले पाहिजे. स्वीकारली पाहिजे. त्यातून राष्ट्रीयत्व निर्माण होईल. माणूसपण निर्माण होईल. सर्वधर्मसमभावाचा विचार अंगीकृत केला जाईल.



**- भूमिपुत्र वाघ**

## रातराणी

नाजूक पाकळ्यांची
फुलली रातराणी
मंद मंद सुगंध
दरवळतो अंगणी

रातराणीचे फूल
गुच्छात वाढे निवांत
प्रफुल्लीत वातावरण
मन करी शांत

जादूगार निसर्गाने
किमया केली न्यारी
आकाशातल्या चांदण्या
जणू अवतरल्या झाडावरी

झुपक्यात वाढतात
फुले रातराणीची
पिवळसर पांढरी
आकर्षक रंगाची

रात्रीला उमलणाऱ्याची
न्यारी तिची तरा
चंद्रप्रकाशात रूप पाहून
आनंद मिळे न्यारा



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जुलै २०२६


## सुशील केकान यांनी उर्दू भाषेतून प्राप्त केली बीए ची पदवी !



**बीड (प्रतिनिधी) :** तालुक्यातील खंडाळा गावचे रहिवासी, कवी, लेखक, प्राध्यापक तसेच उर्दू भाषेचे अभ्यासक म्हणून नावलौकिक असलेले सुशील केकान यांनी उर्दू विषयात बीए ची पदवी प्राप्त केली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथून त्यांनी ही पदवी प्राप्त केली. मे - जून 2026 मध्ये झालेल्या परीक्षेत छत्रपती संभाजीनगर येथील मातोश्री कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय या मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रातून त्यांनी ही पदवी प्राप्त केली असून केकान हे उर्दू भाषेतून बीए करणारे एकमेव पदवीधारक ठरले आहेत. सुशील केकान हे सध्या अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे श्री गाडगे महाराज कनिष्ठ कला व वाणिज्य महाविद्यालय येथे मराठी भाषेचे प्राध्यापक पदी कार्यरत आहेत.सुशील केकान यांनी 2024 मध्ये उर्दू भाषेतून आयसोलेटेड शालांत परीक्षा (१० वी) देखील उत्तीर्ण केली आहे. तसेच त्यांनी उर्दू शिकण्यासाठी 'उर्दू शिकूया' हे पुस्तक लिहिले आहे. या यशाबद्दल प्राचार्य हसन इनामदार, मित्र परिवार तसेच आप्तेष्ट यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## NEP-२०२० नुसार शिक्षकांच्या कार्यभाराची मोजणी करावी; सीएचबी शिक्षकांच्या नियुक्त्यांनाही मान्यता द्यावी - बामुक्टा



*छायाचित्र : प्राध्यापकांव्या विविध प्रश्नावर माननिय शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या समवेत आमदार विक्रमबप्पा काळे शिक्षण संचालक मा.शैलेंद्र देवलाणकर व संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक संपन्न.डावीकडून विश्वास माने, अंकुश कदम, माननीय शिक्षक आमदार विक्रम काळे साहेब, माननीय उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील साहेब, अशोक मोटे , राजेश करपे, उच्च शिक्षण संचालक देवळाणकर साहेब, विश्वनाथ कोक्कर.*

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिर्व्हसिटी कॉलेज टीचर्स असोसिएशन (बामुकटा) यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांना निवेदन देत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-२०२०) अंतर्गत नव्या अभ्यासक्रमानुसार महाविद्यालयीन शिक्षकांचा कार्यभार निश्चित करावा तसेच नियमित भरती होईपर्यंत तासिका तत्त्वावरील (CHB) शिक्षकांच्या नियुक्त्यांना तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, NEP-२०२० अंतर्गत लागू झालेल्या नव्या अभ्यासक्रमात मेजर, मायनर, डीएससी, डीएसई, एसईसी, व्हीएससी, एईसी, ओई, प्रॅक्टिकल, फील्ड प्रोजेक्ट, ऑन-द-जॉब ट्रेनिंग अशा विविध घटकांचा समावेश असल्यामुळे शिक्षकांचा कार्यभार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र कार्यभाराची मोजणी अद्याप जुन्या निकषांनुसार होत असल्याने महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची कमतरता निर्माण होत आहे.बामुकटाच्या मते, विशेषतः विज्ञान शाखेत गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर विषयांमध्ये एका शिक्षकावर अतिरिक्त ताण येत असून विद्यार्थ्यांच्या अध्यापन, प्रायोगिक, फील्ड प्रोजेक्ट, मूल्यमापन आणि शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.संघटनेने शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत —NEP-२०२० च्या नव्या अभ्यासक्रमानुसार सर्व घटकांचा समावेश करून कार्यभाराची स्पष्ट व स्वतंत्र नियमावली जाहीर करावी.प्रत्येक विषयासाठी आवश्यक शिक्षक पदांना मान्यता द्यावी.नियमित भरती पूर्ण होईपर्यंत तासिका तत्त्वावरील (CHB) शिक्षकांच्या नियुक्त्यांना तातडीने मंजुरी द्यावी.विद्यापीठ व महाविद्यालयांना कार्यभार मोजणीबाबत एकसमान मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व शिक्षक पदांना त्वरित मान्यता द्यावी.या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा बामुकटाने शासनाकडे व्यक्त केली आहे. निवेदनावर बामुकटाचे अध्यक्ष डॉ. राजेश करपे, सचिव डॉ. प्रशांतकुमार बनजे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.





